,APD/ICD/2016-17/153

# मुंबई विद्यापीठ

**परीपत्रक क्र. वि.नि.वि.वि/153/२०१६**

**विषय : मतदार जागृती अभियान**

**संदर्भ : १. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, यांचे**
**पत्र क्र. रानिआ/माजअ/२०१६/प्र.क्र.४/का–१० दिनांक ,०७/०४/२०१६**
**२. बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.**
**निवडणूक/चंदनवाडी/२०४/१६–१७ दिनांक २९/०६/१०६**

वरील संदर्भातील पत्रानुसार विद्यापीठ व महाविद्यालयाच्या मदतीने जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त यांनी मतदार जागृती अभियाना बाबत संयुक्तरीत्या करावयाच्या कार्यवाही संबंधी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखडयानुसार महाविद्यालये व विद्यापीठ विभाग यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने मतदार नोंदणी केलेली आहे की नाही यांची खात्री करुन घेणे. विद्यार्थ्याने मतदार नोंदणी केली नसल्यास त्यांचे कडून त्वरीत मतदार नोंदणी फॉर्म नं ६ भरुन घ्यावा.
२. महाविद्यालये व विद्यापीठ विभाग यामध्ये मतदार नोंदणी केंद्र सुरु करावे यासाठी महाविद्यालयाने एका Nodal Officer ची नेमणूक करावी (एखादा कर्मचारी/अधिकारी/शिक्षक). अंतिमरित्या प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांचे मतदार नोंदणी अर्ज संबंधीत जिल्हाधिकारी /निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करावेत.
३. ऑगस्ट महिन्यातील पहिल्या आठवडयामध्ये Virctul Class Room किंवा इतर संवाद माध्यमे वापरुन मा. कुलगुरु व निवडणुक अधिकारी हे सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक विद्यार्थ्यांशी संवाद साधतील व मतदार नोंदणी वाढविण्याचे आवाहन करतील.
४. सप्टेंबर नंतर प्रत्येक महाविद्यालयामध्ये सुरु होणाऱ्या विविध युवा महोत्सव, स्नेहसंमेलन व इतर कार्यक्रमामध्ये मतदार नोंदणी व मतदार जागृती या कार्यक्रमांचे आयोजन करावे.
   - जनजागृती अभियानात एनसीसी, एनएसएस, स्काऊट व गाईड व आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या (Life Long Learning) विद्यार्थ्यांना व इतर विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे.
   - मतदार जागृती संदर्भात वक्तृत्व, वादविवाद, निबंध, पोस्टर्स इ. स्पर्धांचे आयोजन करणे.
   - मतदार जागृती बाबत महाविद्यालयामध्ये विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करणे.
   - मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान करावे यासाठी प्रोत्साहन दयावे.
   - आमच्या उज्जवल भविष्यासाठी मतदान करा असे विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांना आवाहन करणे.
५. विद्यापीठ विभाग आणि महाविद्यालयातील पत्रकारितेच्या (जर्नालिझम) विद्यार्थ्यांना अभियानात सहभागी करुन घेवून त्यांच्याकडून प्रचार साहित्य तयार करुन ते सोशल मिडियावर टाकणे.
६. विद्यापीठ व महाविद्यालयांच्या स्टेशनरीवर मतदार जागृतीचे संदेश छापणे.
७. महाविद्यालयांच्या मदतीने विद्यार्थ्यांना गृहनिर्माण सोसायट्या दत्तक देणे व त्या सोसायट्यांना विद्यार्थ्यांनी भेटी देवून मतदार नोंदणी व मतदानासाठी नागरिकांना आवाहन करणे.
८. उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना व सोसायट्यांना बक्षिसे देण्याची योजना आखणे.

सदर बाबत केल्याचा कामाचा अहवाल एनएसएस युनीट, विद्यापीठ विद्यार्थी भवन, बी. रोड, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२० येथे पाठवावा.

4/7/16

कुलसचिव

मुंबई – ४०० ०२०
दिनांक ४ जुलै २०१६